ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

# चीन या देशाकडून भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा विषयीचे आव्हाने

*गायत्री विश्वास पाटील

** प्रा. डॉ. के. बी. पाटील

*संशोधक, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव.

** श्रीमती एच. आर. पटेल महिला महाविद्यालय शिरपूर

**सारांश:**

*प्रस्तुत चीन या देशाकडून भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा विषयीचे आव्हाने राष्ट्रीय सुरक्षेच्या बदललेल्या विविध पौलूंवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करून भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेचा ऐतिहासिक विकास, आधुनिक स्वरूप व मुख्य मुल्ये यांचा चिकीत्सात्मक विश्लेषण संशोधकाने केले आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या अनुषंगाने भारताच्या शेजारील देशांशी असलेल्या संबंधाच्या दृष्टीकोनातून भारताच्या सुरक्षेवर पडणाज्या प्रभावाच्या संदर्भात अभ्यास करून त्या अनुषंगाने भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेशी असलेला संबंध, संक्षिप्त रूपात मांडण्याचा संशोधकाने प्रयत्न केलेला आहे.*

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रास्ताविक:**

21 व्या शतकात प्रत्येक देश जागतिकीकरणाच्या प्रवाहामध्ये ओढला गेला आहे. शीत युध्दाचा शेवट झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात सुरक्षा या संकल्पनेस अधिक महत्व प्राप्त झाले. कारण या काळात सुरक्षेच्या स्वरूपात मोठया प्रमाणावर बदल झालेला आहे. पारंपरिक व अपारंपरीक स्वरूप सुध्दा बदललेले आहे. आज राष्ट्रीय सुरक्षा ही संकल्पना फार व्यापक झाली आहे. पारंपरिक सुरक्षेत सुरक्षेचे राष्ट्रंच्या सीमांचे रक्षण करून परकीय आक्रमणांपासुन राष्ट्राचा सार्वभौमत्वाचे रक्षण करणे हा एक सुरक्षेचा महत्वाचा हेतू होतो. परंतू जसजसे जग आधुनिकतेकडे वाटचाल करू लागले, तसतसे युध्दाच्या पध्दती व प्रकार यातही महत्वपूर्ण बदल झालेत. त्याचप्रमाणे शत्रु कार्यवाहीच्या स्वरूपात देखील बदल झालेले आहेत. त्यामुळे अंतर्गत व बाहय धोक्यांचे स्वरूपातही बदललेले आहे.

'राष्ट्रीय सुरक्षा' ही एक गुंतागुंतीची संकल्पना असून तीची परिपूर्ण व्याख्या करून स्वरूप निश्चित करणे अवघड आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात दररोज अनेक घडामोडी होत असतात ज्या सुरक्षेच्या संकल्पनेला प्रभावित करत असतात. आंतरराष्ट्रीय संबंधाचे संदर्भही दिवसेंदिवस बदलत असून मित्रत्व किंवा शत्रुत्व यांच्या मर्यादा अजुन विस्तीर्ण व गंभीर

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

होत आहेत. राज्यांचा सुरक्षेची संकल्पना आज मोठया प्रमाणावर त्या राज्यांचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्वानावरसुध्दा अवलंबूवन आहे. म्हणून सध्याच्या जागतिकीकरणात राष्ट्रीय सुरक्षेला विविध पौलू प्राप्त झालेले असुन त्यांच्यात सतत बदल होत आहे. उदा. पारंपरिक सीमांचे रक्षण करून देशाचे अखंडत्व व सार्वभौमत्व अबादित राखण्याच्या पारंपरिक दृष्टिकोनात आज व्यापक बदल झालेला आहे. आज प्रत्यक्ष सीमारेषांचे संरक्षण करण्याबरोबर दहशतवाद अंतर्गत सुरक्षा, मानवी सुरक्षा, आर्थिक स्थौर्य, राजकीय स्थिरता, बेरोजगारी, सायबर सुरक्षा, अन्न सुरक्षा, पाणी सुरक्षा, पर्यावरणीय सुरक्षा, आरोग्य सुरक्षा व प्रादेशिक सुरक्षा आदी राष्ट्रीय सुरक्षेच्या व्याप्तीत भर टाकली आहे. राज्याला एकाच वेळेस अनेक आघाडयांवर लढावे लागत आहे. म्हणून राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोन खूप व्यापक झालेला आहे.राष्ट्राला भेडसावणारी 'सर्वाधिक मोठी समस्या म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा' हे आज सर्वमान्य झाले आहे. राष्ट्र आणि सुरक्षा हया दोन्ही संकल्पना परस्परांशिवाय अस्तित्वात राहू शकत नाहीत. दोघांच्या अस्तित्वासाठीच युध्दांची निर्मिती होते असे आजपर्यंतच्या इतिहासावरूनही स्पष् होते. म्हणूनच 'सुरक्षा' या संकल्पनेच्या विश्लेषणासाठी तसेच त्यावर उपाय म्हणून 'शक्ती आणि शांतता' या संकल्पनाही अभ्याणे महत्वाचे आहे.

1) वास्तववादी आणि

2) आदर्शवादी हे दोन दृष्टिकोन शतकांपासून, किमान दशकांपासुन राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना स्पष्ट करतांना मांडले जातात, ते पुढीलप्रमाणे-

1) शक्ती संपत्तीद्वारे मिळते आणि त्यातुन क्षमता निर्मिती होते. क्षमता व देशाची आधारभूत मूल्य, राष्ट्राच्या स्वभाव व धोरणावर परिणाम करतात. त्यातून देशांच्या विविध धोरणांची दिशा ठरते. हा मॉर्गेथांचा वास्तववादी दृष्टिकोन म्हणून ओळखला जातो.

2) आदर्शवादी विचारधारेमध्ये संतुलित विकासातुन शांतता व शांततेद्वारेच शाश्वत सुरक्षा येईल असे मानतात. युध्द हाच राष्ट्रीय सुरक्षेला धोका असल्याने त्याचे जागतिक व्यवस्थेतून निर्मूलन हा विचार आदर्शवादी विचारवंत मांडतांना दिसतात.सारांश, शक्तीतून क्षमता आणि त्यातून सुरक्षा शक्य आहे. शक्ती आणि शांतता यांचे अंतिम साध्य म्हणजे सुरक्षा असा अर्थ वरील विवेचनातून अधिक स्पष्टपणे मांडता येईल. शक्तीतून सुरक्षेची निर्मिती पेक्षा सुरक्षेचा साथीदार म्हणून शक्ती, आणि या शक्तीचा परिणाम म्हणून शांतता निर्मिती पेक्षा शांततेसाठीची पूर्व अट म्हणजे सुरक्षा आणि शक्ती होय, अशीही मांडणी केली जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणात आपले स्थान टिकवण्यासाठी राष्ट्रशक्ती महत्वाची ठरते. कोणत्याही देशाला अंतर्गत व बाहय धोक्यांपासून सुरक्षा करावी लागते. अंतर्गत सुरक्षेसाठी देशात स्थिरता राखणे महत्वाचे असते. जातीय कलह, जातीयता, प्रादेशिकता, आर्थिक कमकुवतपणा, दहशतवाद यामुळे अराजकता निर्माण होऊन ती सुरक्षेला बाधक ठरते तर बाहय धोक्यांच्या निवारणासाठी कराव्या लागणाज्या सुरक्षेचा आधार परराष्ट्र व्यवहार असतो. यशस्वीपणे संपादन केलेले परराष्ट्र संबंध आणि मुत्सद्देगिरीच्या साहयाने राष्ट्रहित सुरक्षित राखणे व इतर देशांवर आपला प्रभाव कायम ठेवण्यासाठी सक्षम करणे

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

*Volume–XII, Issue– VI (Special Issue-I)* *Nov – Dec, 2023*

OPEN ACCESS Original Research Article

आवश्यक ठरते. 14 राष्ट्रीय सुरक्षेच्या पारंपरिक पध्दतीमध्ये लष्करी सामर्थ्यावर अधिक भर होता. त्याआधारे रणनिती व व्यूहरचना केली जात होती. परंतू 1970 च्या दशकाच्या शेवटी परिस्थिती बदलली. तष्करी तंत्रज्ञानाचा विकास झाला. 1970 मध्ये सोव्हिएत रशियाचे विघटन झाले. एका महासत्तेचा अस्त झाला. शितयुध्द संपले. नविन जागतिक व्यवस्था निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू झाली. आर्थिक बाबी महत्वाच्या ठरल्या. सुरक्षेच्या प्रश्नांकडे नव्याने पाहिले जावू लागले. सामाजिक घटक आणि मानवी सुरक्षा यांच्या आधारे राष्ट्रीय, सुरक्षेची मांडणी होऊ लागली. त्याला फक्त आर्थिक पाठबळ देणे महत्वाचे झाले आहे.

भारताची राष्ट्रीय सुरक्षेचे धोके :दुसज्या महायुध्दानंतर जगाचे द्विध्रुवीकरण झाले. त्यावेळी भारताला स्वातंत्र्य मिळाले. ध्रुवीकरणाच्या राजकारणात आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी भारताने अलिप्तवादाचा स्वीकार केला. याच काळात भारतावर पाकिस्तानचे आक्रमण झाले. त्यामुळे सुरूवातीपासूनच भारताच्या भौगोलिक अखंडतेच्या राष्ट्रीय सुरक्षेसंबंधी सतर्कता बाळगणे आवश्यक झाले. भारताच्या फाळणीबरोबरच काश्मीरवरील पाकिस्तानचे आक्रमण त्याला काही देशांनी दिलेले युध्दनौतिक समर्थन, भारत-चीन सीमावाद, चीन व पाकिस्तान यांच्या सहयोगामुळे भारताच्या सुरक्षा धोरणावर परिणाम झाला. पाकिस्तानची काश्मीर, सियाचीन संबंधीची भुमिका, आण्विक स्पर्धा आणि चीनची वाढती परंपरागत व आण्विक शस्त्रक्षमता यांचाही भारताच्या सुरक्षेवर परिणाम होत असतो. 1947 मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले त्याचबरोबर सुरक्षेची व संरक्षणाच्या समस्या निर्माण झाल्या. 17 आर्थिक साधनांची उणीव, अपुरी साधने यांचा भारताच्या सुरक्षेवर विपरीत परिणात झाला. भारताला आपल्या आर्थिक व संरक्षण साहित्याच्या व औद्योगिक विकासासाठी विकसित देशांवर अवलंबून रहावे लागले. कारण भारत आर्थिक, सामाजिकदृष्टया मागासलेला होता. विकसित देशांकडून आधुनिक तंत्रज्ञान हस्तांतरणाची समस्या निर्माण झाली.

आंतरराष्ट्रीय परिस्थितीत भारताच्या शेजारील देशांशी चांगले संबंध ठेवणे गुंतागूंतीचे झाले आहे. भारत लोकशाही राष्ट्र आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने आपल्या परराष्ट्र धोरण आणि अलिप्तवादी धोरणंामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणावर वेगळा ठसा उमटवला. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताचा प्रभाव वाढला आणि शेजारील देशांचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन संशयास्पद झाला. आंतरराष्ट्रीय पर्यावरणात भारताशेजारील देश आपले अस्तित्व अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. त्यामुळे भारताच्या विविध पातळीवर तणाव निर्माण झाला. भारताच्या शेजारील देशांमध्ये एक साम्यवादी (चीन), तीन लष्करी हुकुमशाही (पाकिस्तान, बांग्लादेश, ब्रम्हदेश) दोन राजेशही असलेले देश (नेपाळ व भूतान) होते. त्यातून भारताच्या लोकशाहीला धोका निर्माण होऊ शकतो. शेजारच्या देशांशी असुरक्षेची भावना व स्वअस्तित्व राखण्यासाठी कोणतीही विघातक कार्यवाही होऊ नये म्हणून अलिप्तता चळवळीतून समान उद्दिष्टे निश्चित केली आहेत. त्यात आर्थिक सहकार्य शांतता व सहअस्तित्व यासाठी दक्षिण आशियायी संघटनेची निर्मिती करण्यात पुढाकार घेऊन शेजारील देशांमधील गौरसमज दूर करण्याचा

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

*Volume–XII, Issue– VI (Special Issue-I)* *Nov – Dec, 2023*

OPEN ACCESS Original Research Article

प्रयत्न केला. भारत आणि भारतीय उपखंडातील देश भौगोलिकदृष्ट्या एकजीनसी असल्याकारणाने त्या देशांतील समस्या सारख्याच आहेत. बांगला देशातील बंगाली, पाकिस्तानातील पंजाबी व पठाण, श्रीलंकेतील तामिळ लोक व भारतातील लोक यांच्यात वांशिक साम्य आहे. त्यांच्यावर तेथील सरकारने दबाव आणण्याचा प्रयत्न केला तरी तेथे स्वायत्ततेची मागणी होते. हे सर्व भारतीय भूभागातील लोक असल्यामुळे त्याचा भारताच्या सुरक्षेवर अप्रत्यक्षपणे परिणाम होतो.भारताच्या शेजारच्या देशात, भारताचा मोठा आकार, मोठी साधन संपत्ती व मोठया प्रमाणात केलेल्या विकासामुळे त्यांच्यात असुरक्षेची भावना निर्माण झाली आहे. म्हणून ते नवीन शस्त्रास्त्रे हस्तगत करण्याचा प्रयत्न करतात. त्यातूनच दक्षिण आशियायी भागात शस्त्रस्पर्धा निर्माण झाली आहे. भारताच्या शेजारील देश, भारतातील सीमालगतच्या घटक राज्यात अस्थिरता निर्माण करीत असतात. उदा. आसाम समस्या, नागालँन्ड, मिझोराममधील समस्या, चीनमुळे आणि काश्मीर व पंजाब समस्या पाकिस्तानमुळे निर्माण झालेल्या आहेत. या सर्व समस्या, मानवतावादी धोरणातून सोडविण्याचा प्रयत्न भारताचा असतो."

चीन देशाकडून असलेले धोके = भारताच्या उत्तेरला हिमालयाच्या उत्तुंग पर्वत रांगांच्या पलिकडे विस्तीर्ण पसरलेला चीन हा आशिया खंडातील एक शक्तीशाली व विकसनशील अवस्थेतील देश आहे. एकोणीसव्या शतकापूर्वी चीन हा एक वौभवशाली संस्कृती असलेला देश होता. परंतु आठराव्या आणि एकोणीसव्या शतकात पाश्चमात्य आणि साम्राज्यवादी राष्ट्रांनी त्याचे जे शोषण केले त्यामुळे ते राष्ट्र अविकसित व शोषित राष्ट्र बनले. चीनसंबंधी नेपोलियनने असे म्हटले होते की, "चीन हा निद्रिस्त अवस्थेतील राक्षस आहे. त्याला तसेच राहू द्या. तो जर जागा झाला तर संपूर्ण जगाला त्याची दखल घ्यावी लागेल".

चीन हा जगातील एकमेव देश आहे, ज्याचे पंधरा देशांबरोबर सीमा-निश्चितीला धरून वाद आहेत. यात रशिया, भारत, जपान, कोरिया, फिलिपाइन्स, ब्रुनेई, मलेशिया, इंडोनेशिया, व्हिएतनाम इत्यादी देशांबरोबर सीमाप्रश्न आणि लहान-लहान बेटांना धरून वाद आहेत. 1990 च्या दशकात रशिया आणि काही मध्य आशियाई देशांसमवेतचा सीमावाद चीनने बऱ्याच अंशी सोडवला; पण कुराईल बेटांवरून दक्षिणपूर्व राष्ट्रांशी चीनचा अद्याप संघर्ष चालूच आहे. 37 चीनने अनेकदा सीमावाद सोडवण्यासाठी बळाचा वापर केल्यामुळे शेजारी राष्ट्रांमध्ये चीनविषयी भीती आणि अविश्वासाचे वातावरण आहे. 1962 मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले, तर 1979 मध्ये व्हिएतनामविरोधी बळाचा वापर केला.

1980 च्या दशकात सीमावादाला धरून विविध देशांशी असलेल्या चीनच्या भांडणात चीनने जरा नमती भूमिका घेतली होती; कारण तो चीनच्या अंतर्गत विकासाचा काळ होता; पण 1990 मध्ये मात्र चीनने या बाबतीत पुन्हा एकदा जहाल भूमिका घ्यायला सुरुवात केली. याच दशकात हाँगकाँग आणि मकाऊबरोबर आपले एकीकरण झाल्यानंतर तौवानच्या एकीकरणासाठी आता चीन सरळ-सरळ युद्धाचीच भाषा वापरत आहे. बळाचा वापर करण्याबरोबरच सीमावाद सोडवण्यासाठी चीनचे आपले एक स्वतंत्र धोरण आहे, जे चीनने बहुतेक सर्व शेजारी राष्ट्रांविरोधी वापरले आहे. यात

मुख्य सीमारेषेविषयी चर्चा करताना इतर असंबंधित मुद्दे उपस्थित करणे, जसे भारताबरोबर सिक्कीम आणि अरुणाचलचा मुद्दा चीनने उपस्थित केला आहे. दुसरे म्हणजे प्रश्न दीर्घकाल-पर्यंत चिघळत ठेवणे, जसे तिबेटचा प्रश्न. हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने चीनने कोणतेही ठोस उपाय गेल्या पन्नास वर्षांत केलेले नाहीत. आपला हक्क किंवा दावा न सोडता चर्चा चालूच ठेवणे आणि जेव्हा परिस्थिती परिपक्व बनेल, तेव्हाच अंतिम निवाड¶ाची (Final Settlement) भाषा करणे, ही या धोरणातील तत्त्वे आहेत. 1988 पासून भारत आणि चीनदरम्यान सीमाप्रश्न सोडवण्यासाठी वार्षिक चर्चेच्या फेज्या चालल्या आहेत आणि यापुढेही अशाच चालू राहतील; कारण हा प्रश्न शक्य तेवढा रेंगाळत ठेवण्यात चीनला स्वारस्य आहे, तोपर्यंत इतर देशांसमवेत सीमावादासंबंधी चीनला बोलणी करता येतात.

भारताने तिबेटविषयी आणि विशेषत: दलाई लामांविषयी घेतलेल्या भूमिकेमुळे भारत-चीन संबंधात कटुता निर्माण झाली आहे. चीन पाकिस्तानला अण्वस्त्रतंत्रज्ञान आणि क्षेपणास्त्र पुरवत असल्यासंबंधी सबळ पुरावे भारताकडे असल्यामुळे चीनविषयी एक प्रकारचा अविश्वास भारतात निर्माण झाला आहे. 1998 मध्ये भारत अण्वस्त्रधारी झाल्यानंतर भारत-चीन संबंध पुन्हा एकदा तणावपूर्ण झाले होते.1962 मध्ये चीनने भारतावर केलेल्या आक्रमणापासून तर अगदी अलीकडच्या काळात तौवानला चीनकडून मिळत असलेल्या लष्करी कारवाईच्या धमक्या हेच दर्शवितात. दक्षिण आशियातील छोट¶ा राष्ट्रामध्ये भारताविषयी भीती आणि संशय निर्माण करून भारताशी असहकार्य करण्यास त्यांना चिथावणे, तसेच ही राष्ट्रे भारताच्या प्रभावापासून मुक्त व्हावीत यासाठी त्यांना आर्थिक व लष्करी मदत देणे, दक्षिण आशियाई राष्ट्रांनी भारताच्या प्रभावाला बळी न पडता स्वतंत्र परराष्ट्रधोरणाचा स्वीकार करावा यासाठी त्यांच्यावर दबाव आणणे हे चीनचे शीतयुद्धकाळात धोरण होते. दक्षिण आशियातील भारताच्या वाढत्या प्रभावाचे प्रतिरोधान करण्यासाठी भारताच्या शेजारील लहान राष्ट्रांचा प्यादी (Pawns) म्हणून वापर चीनकडून होत आहे.

दक्षिण आशियातील भारताच्या प्रभावाला संतुलित करण्यासाठीच चीनने पाकिस्तानशी संबंध घनिष्ट केले. चीन-पाकिस्तान मौत्रीमागचे मुख्य कारण दक्षिण आशियातील भारताच्या प्रभावाला शह देणे हेच आहे. चीन आणि पाकिस्तानमधील संबंध हा एका अनोख्या मौत्रीचा उत्तम नमुना आहे. ही एक अशी मौत्री आहे की, ज्यामध्ये एक मोठे राष्ट्र आपल्या शेजारील लहान राष्ट्राला केवळ आर्थिक आणि लष्करी मदतच करत नाहीय; तर त्या लहान राष्ट्राला अण्वस्त्रधारी बनवण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान आणि साधनसामग्रीची सर्वतोपरी मदत करते. पाकिस्तानचा अण्वस्त्रविकास कार्यक्रम चीनच्या मदतीवरच विकसित झाला आहे. चीनने केवळ काश्मीरच्या प्रश्नावरच पाकिस्तानची बाजू उचलून धरली नाही, तर 1965 आणि 1971 च्या भारत-पाकिस्तान युद्धामध्ये पाकिस्तानला मोठी मदत केली. चीनने दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या माध्यमातून हिंदी महासागरात पाय रोवण्याचा आणि भारतीय नौदलाला शह देण्याचा प्रयत्न केला. पश्चिमेला पाकिस्तानच्या माध्यमांतून तर पूर्वेला बांगलादेश आणि म्यानमारच्या माध्यमांतून हिंदी महासागरात

चीन आपले नाविक सामथ्र्य वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. याच उद्दिष्टपूर्तीसाठी चीनने श्रीलंकेबरोबरदेखील संबंध घनिष्ट केले आहेत. श्रीलंका आणि पाकिस्तानमधील विशेष मौत्रीचा चीनने फायदा उचलला. हिंदी महासागरात आपले नाविक सामथ्र्य वाढवून भारताला लष्करी वेढा घालण्याचा प्रयत्न चीनकडून होतो आहे.

**संदर्भ सुची :**


1. जाधव व्ही.आय. भारताची राष्ट्रीय सुरक्षा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे 2011, पान नं.13-14
2. व्ही.वाय. जाधव- भारताची अंतर्गत सुरक्षा, पेज नं.14
3. संजयकुमार, गुलाबचंद्र ललीत, राष्ट्रीय सुरक्षा (मुद्दे और चुनौतीयाँ), मोहित पब्लीकेशन्स, न्यू दिल्ली, 2012. पृ.44-
4. मुनेषकुमार डॉ. भारतीय राष्ट्रीय सुरक्षा, पान नं.03, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस प्राइवेट लिमिटेड, नई दिल्ली, प्रथम संस्करण- 2010
5. डॉ.बी.डी. तोडकर, भारतीय राष्ट्रीय सुरक्षितता, पान नं.3, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2016.
6. जाधव व्ही.आय. डॉ. भारताची राष्ट्रीय सुरक्षा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे-2011, पेज नं.35
7. शौलेंद्र देवळाणकर- भारतीय परराष्ट्र धोरण, सातत्य आणि स्थित्यंतर, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद 2005,पृ.44
8. जोगळेकर सुधीर, घुसखोरी- एक नि:शब्द आक्रमण, पुणे- 1995 पान नं.25


.

***Cite This Article:***

Patil G.V. & Prof. Dr. Patil K.B. (2023). ***चीन या देशाकडून भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा विषयीचे आव्हाने***. In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 1–6). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10474086